दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १७३ वा रविवार दि.२२ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मस्साजोग सारख्या दुर्दैवी घटना घडल्या नाही पाहिजे-शरदचंद्र पवार

**संतोष अण्णा देशमुख यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख शरदचंद्र पवार यांनी स्वीकारली**

केज /प्रतिनिधी पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा घटना घडणं हे अत्यंत दुर्दैवी असून या घटनेची सखोल चौकशी होऊन यामध्ये जे दोषी असतील त्यांना कडक शासन होणे गरजेचे आहे. असे स्पष्ट मत राष्ट्रवादी शरचंद्र पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब यांनी व्यक्त केले. त्यांनी मस्साजोग येथील देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली यावेळी ते बोलत होते. शरदचंद्र पवार साहेब यांनी स्व. संतोष अण्णा देशमुख यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली आहे. पुढे बोलताना म्हणाले की, बीड जिल्हा हा वारकरी, कष्टकरी शेतकरी यांचा म्हणून सर्वत्र ओळखला जातो परंतु केज तालुक्यातील मस्साजोग येथील युवा सरपंचाची निघृणपणे हत्या होऊन तेरा दिवस उलटून गेले आहेत. संपूर्ण राज्यामध्ये या घटनेचे पडसाद उमटत आहेत. यातील काही आरोपी पोलिसांनी अटक केलेली आहेत परंतु उर्वरित आरोपी आणखीही पोलिसांच्या हाती सापडलेले नाहीत. याच पार्श्वभूमीवर राज्यातील विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते मस्साजोग येथे भेट देऊन देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन करत आहेत. आणि आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करत दोषींना कडक शासन करण्याची भूमिका मांडत आहेत. आणि याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही मसाजोग येथे शनिवार दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा घटना घडण हे अत्यंत दुर्दैवी असून महाराष्ट्रासाठी ही शरमेची बाब




असल्याचे बोलून दाखवले. उर्वरित आरोपींना तात्काळ अटक करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन यातील दोषींना कडक शासन होईल असे प्रयत्न करावेत. एवढेच नव्हे तर संतोष देशमुख यांच्या यांच्या मुलांच्या शिक्षणाची ही जबाबदारी आम्ही घेत असल्याचे यावेळी बोलून दाखवले. आणि त्यांच्या कुटुंबियांना आम्ही सर्वजण मिळून आधार देवू आम्ही खंबीरपणे देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी उभे असल्याचाही विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. देशमुख यांच्या कुटुंबियांना जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत मी व माझे शिलेदार पाठीमागे सरकणार नाहीत माझा पक्ष व मी देशमुख कुटुंबाच्या व ग्रामस्थांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे आहोत अशी ग्रामस्थांना ग्वाही देखील शरदचंद्र पवार साहेब यांनी दिली आहे.

## लातूर येथील रेल्वे फॅक्ट्रीतून कोच निर्मीती सुरु करा खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची लोकसभेत मागणी

धाराशिव :- लातूर येथील बहुप्रतीक्षीत रेल्वे कोच फॅक्ट्रीतून कोच निर्मीती सध्या बंद असून शासनाने मोठा गाजावाजा करत दोन वेळा उद्घाटन केलेल्या कोच फॅक्ट्रीतून अद्याप एकाही कोचाची निर्मीती झाली नाही. सदर प्रश्नावर लोकसभेमध्ये रेल्वेच्या प्रश्नावर बोलत असताना खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सदर रेल्वे फॅक्ट्री लवकर सुरु करुन स्थानिकांना रोजगार निर्माण करुन देणेबाबत रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्याकडे केली .



भारतीय रेल्वेने महाराष्ट्रातील लातूर शहरात मेट्रो व रेल्वेचे अद्यावत कोच निर्मीती करण्याचा निर्णय घेल रेल्वे विभाग यामध्ये १ हजार ५०० कोटी रुपये इतकी गुंतवणुक करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणार असल्याचे जाहिर केले होते. तत्कालीन रेल्वे मंत्री पियुष गोयल यांनी सदर फॅक्ट्रीस मान्यता देण्यात आल्याचे जाहिर केले होते.

सदर रेल्वे कोच फॅक्ट्री रेल्वे विकास निगम लिमीटेड यांचे अंतर्गत असून सदर रेल्वे फॅक्ट्रीचे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्रकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करत या फॅक्ट्रीमधून इलेक्ट्रीक रेल्वे तसेच वंदे भारत रेल्वेचे कोच निर्माण करणार असल्याचे जाहिर केले होते. प्रत्यक्षात मात्र सदर रेल्वे फॅक्ट्री केवळ पांढरा हात्ती ठरत असल्याचे नागरीकात चर्चा असून अद्याप या फॅक्ट्रीमधून स्थानिकांना कोणत्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध होत नसल्याची बाब खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेच्या हिवाळी अधिवेशन २०२४ दरम्यान रेल्वे मंत्रीच्या निदर्शनास आणुन दिली.

सदर रेल्वे फॅक्ट्री तत्काळ सुरु करुन स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणेबाबत मा. रेल्वेमंत्रीकडे मागणी केली आहे.

## महाविहार येथे २५ डिसेंबर रोजी सातवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद.

लातूर :- बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्या वतीने पु. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली, पु. भिक्खु धम्मसेवक महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, रामेगाव, लातूर येथे ७ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. बुधवार रोजी संपन्न होणाऱ्या सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या सभा मंडपाचे रोपण माजी नगरध्यक्ष मा. लक्ष्मण कांबळे, साहेबराव नरवाडे,पोलीस निरीक्षक, गांधी चौक लातूर यांच्या हस्ते तर प्रा.बापू गायकवाड, डी. एस. नरसिंगे ,प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, बसवंतप्पा उबाळे, प्रा. यु डी गायकवाड, पांडुरंग अंबुलगेकर, विश्वनाथ आल्टे, सुशील चिकटे, आंनद सोनवणे, भीमराव चौदंते, ज्योतीराम लामतुरे, मिलिंद धावारे, उदय सोनवणे, परमेश्वर आदमाने, प्रमोद देठे, सतिश मस्के इत्यादीच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.दि २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळच्या प्रथम सत्रात सकाळी ठीक ०८:०० वाजता डॉ आंबेडकर चौक बौध्द नगर येथे धम्मध्वजारोहण करून बुध्द मुर्ती सहित भिक्खु संघ उपासक उपासिका यांची लातूर शहरातून भव्य मिरवणूकीस प्रारंभ होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथे समापन होणार आहे. दुसऱ्या सत्रात दुपारी ठीक १२:०० वाजता






सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे उदघाटन श्रीलंकेचे माजी खासदार तथा राष्ट्रपतीचे धार्मिक सल्लागार पु. भिक्खु अतुरलीय रतन महाथेरो यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणेम्हणून माजी सामाजिक न्याय मंत्री तथा बावीस प्रतिज्ञा चे मुख्य प्रवर्तक मा. राजेंद्र पाल गौतम, (नवी दिल्ली) दिवंगत रोहित वेमुला (हैद्राबाद )यांच्या मातोश्री मा. राधिका वेमूला, राज्याचे नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री मा. बाबासाहेब पाटील,माजी मंत्री मा.आ.संजय बनसोडे,माजी मंत्री मा.अमित देशमुख मा.आ. अभिमन्यू पवार मा.आ.रमेशप्पा कराड, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक मा. इंजि. अनिलकुमार गायकवाड, जिल्हाधिकारी.मा. वर्षा ठाकूर, जिल्हा पोलीस अधीक्षक मा. सोमेय मुंडे, मनपा आयुक्त मा. बाबासाहेब मनोहरे,उपजिल्हा धिकारी मा.डॉ. भारत कदम,पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.डॉ. एस. पी. गायकवाड, माजी नगराध्यक्ष मा.लक्ष्मण कांबळे पोलीस निरीक्षक मा. साहेबराव नरवाडे इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व समस्त लातूरकरांच्या वतीने समाजातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, प्रशासकीय, संस्कृतीक क्षेत्रात कृतिशील योगदान देणाऱ्या व्यक्तींना प्रथमतःच राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार देण्यात येणार आहेत.याप्रसंगी देश विदेशातील भिक्खु संघाची धम्मदेसना रात्री उशिरा पर्यंत होणार आहेत. तिसऱ्या सत्रात सायंकाळी उशिरा सुप्रसिद्ध विद्रोही गायिका क्रांतीशाहीर मा. शीतल साठे व मा.सचिन माळी यांचा आंबेडकरी जलसा कार्यक्रम होणार आहे.

तेंव्हा या एक दिवसीय संपन्न होणाऱ्या सातव्या अखिल भारतीय धम्म परिषदेस समस्त लातूर जिल्यातील बौद्ध उपासक उपासिकांनी पांढरे वस्त्र परिधान करून उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो व बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षक चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने करण्यात आले आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर आगमन व प्रयाण



लातूर :- बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे जाण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांच्यासोबत आमदार विक्रम काळे, आमदार अमोल मिटकरी होते. त्यांनी लातूर विमानतळ येथून हेलिकॉप्टरने मस्साजोगकडे प्रयाण केले. यावेळी विमानतळावर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्रभारी जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पोलीस उपाधीक्षक गोरख दिवे, तहसीलदार सौदागर तांदळे, वस्तू व सेवा कर विभागाचे सहायक राज्यकार आयुक्त गौरीहर स्वामी यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

## माजी नगरसेवक हनुमंत जाकते (अंकल) यांना अखेरचा निरोप

लातूर:- लातूर शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक,आंबेडकरी चळवळीतील,तसेच भाजपाचे कार्यकर्ते हनुमंत जाकते यांना शनिवार,दि.२१ डिसेंबर २०२४ रोजी हजारोंच्या उपस्थितीत,शोकाकुल वातावरणात, मारवाडी स्मशानभूमीत अखेरचा निरोप देण्यात आला.रविवारी २२ डिसेंबर रोजी रात्री कॉईल नगर येथील निवासस्थानी त्यांचा जलदान विधी ठेवण्यात आला आहे.

गेली अनेक महिन्यांपासून पोटाच्या विकाराने ते त्रस्त होते.शुक्रवारी २० डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता त्यांना एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.तथापि सायंकाळी सात आठच्या सुमारास त्यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५८ होते.शनिवारी त्यांना साश्रुनयांनी अखेरचा निरोप देण्यात आला,अंकल या नावाने ते सर्वपरिचित होते.दलित पँथर,रिपब्लिकन पार्टी,दलित मुस्लिम युवा भीमसेना,तसेच आंबेडकरी संघटनांमध्ये त्यांनी काम केले होते.काही वर्षांपासून ते भारतीय जनता पार्टीतही कार्यरत होते.२०१७ पासून त्यांनी लातूर



नगर पालिकेचे नगरसेवकपद भूषविले होते. कोणावरही विनाकारण झालेला अन्याय निवारणासाठी ते धावून जात असत.काही वर्षांपासून त्यांना पोटाच्या आतड्यांचा त्रास होत होता,अनेकदा उपचार करुनही त्यांना त्यावर मात करता आली नाही. त्यांच्या निधनाने एक समाजप्रिय कार्यकर्ता हरवल्याची भावना व्यक्त होत आहे.यावेळी झालेल्या शोकसभेत माजी पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी शोक संदेश पाठविला, भंते पय्यानंद थेरो,माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे,मोहन माने,चंद्रकांत चिकटे, अनंत लांडगे,साधू गायकवाड,भामडासिंग जुन्नी,हातीम शेख यांनी शब्दांजली वाहिली.यावेळी पत्रकार अशोक हनवते, रघुनाथ बनसोडे, डॉ. सितम सोनवणे, बाळ होळीकर, डी एल वाघमारे व मंगेश बिराजदार, दीपक मठपती, गुरुनाथ मगे, गणेश गोमसाळे, गोरोबा गाडेकर, सुनील मलवाड, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, शोभाताई पाटील एन.डी.सोनकांबळे, सिद्धार्थ सूर्यवंशी, लाला सुरवसे, यशपाल कांबळे, राहुल कांबळे, जितेंद्र बनसोडे, रमाकांत पिडगे, जयंत ताकपिरे, दिलीप कांबळे, विनोद मालू,लक्ष्मण गोरे,हतिमभाई शेख,विनोद खटके,दिलीप गायकवाड,पंकज काटे, विनोद लोंढे, बालाप्रसाद धोत्रे आदिंची उपस्थिती होती.

स्मृतीशेष हनुमंत जाकते यांच्या पश्चात भाऊ,भावजय,पत्नी,विनय व विक्रांत ही दोन मुले,सून,नातवंडे,असा परिवार आहे. त्यांच्या या दुःखद निधनामुळे जाकते परिवाराच्या दुःखात दैनिक महावृत्त परिवार सहभागी आहे.

## महीलांनी आर्थिक स्वावलंबी होवून स्वताच्या पायावर उभे रहाणे गरजेचे - सौ. अदिती अमित देशमुख

लातूर / प्रतिनिधी :- विलासराव देशमुख फाउंडेशनच्या पुढाकाराने लातूर जिल्ह्यातील मौजे कातपुर येथे महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकत, फाउंडेशनच्या वतीने मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आले आहे. या केंद्राचा शुभारंभ ट्वेंटीवन ग्री लीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांची उपस्थिती करण्यात आला. ग्रामीण भागातील महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या प्रशिक्षण केंद्रात एकूण ९६ महिलांनी सहभाग घेतला आहे. या केंद्रामध्ये महिलांना शिलाईचे विविध प्रकार, डिझाइनिंग आणि व्यवसायाची मूलभूत माहिती दिली जाणार आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमात महिलांना स्वतःचे




व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमात बोलताना सौ. अदिती अमित देशमुख यांनी, महिला सक्षमीकरणाचे महत्त्व विशद केले. यासाठी महीलांनी आर्थिक स्वावलंबी होवून स्वताच्या पायावर उभे रहाणे गरजेचे आहे असे सांगून त्यांनी या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमात महिलांना आत्मनिर्भर बनण्याची संधी मिळणार असल्याचे सांगितले. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या पुढाकाराने येणाऱ्या काळात महीलांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगीतले. यावेळी संस्थेच्या समन्वयक संगीता मोळवणे, सरपंच रेणुकाताई तुकाराम आयतन बोयणे, उपसरपंच विष्णू (मनोज) बालासाहेब देशमुख, ग्रामपंचायत सदस्य महादेव प्रभाकर मस्के, माजी ग्रामपंचायत सदस्य विमलबाई राजाराम गलांडे, भाऊसाहेब बापुराव लोखंडे, ट्रेनर सेजल सुर्यवंशी, संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे आणि गावातील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## संपादकीय....

# न्यायाधीश यादवांवर महाभियोग.

सध्या आपल्या देशातील राजकारणात एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू आहे. अलाहाबाद उच् न्यायालयाचे न्यायाधीश शेखर यादव यांच्याविरोधात बजावलेली महाभियोगाची नोटीस.

न्या. यादव यांनी अलीकडेच विश्व हिंदू संमेलनात जातीय तेढ वाढेल असे भाषण केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. संसदेतील विरोधी पक्षांच्या ५५ खासदारांनी त्यांच्या विरोधात महाभियोगाची कारवाई सुरू करावी, अशी नोटीस राज्यसभेच्या सचिवालयाला दिली आहे. प्रजासत्ताक भारतातील ही दुर्मीळ घटना आहे.

न्या. यादव यांनी राज्यघटनेत घालून दिलेल्या चौकटीचे उल्लंघन केल्याचे या नोटिसीत म्हटले आहे. ८ डिसेंबर रोजी केलेल्या भाषणांत न्या. यादव यांनी 'भारतात लोकशाही आहे. मात्र, देश बहुसंख्याकांच्या इच्छेनुसार चालला पाहिजे, वगैरे वक्तव्यं केले होते. हे भाषण त्यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कायदा विभागाच्या कार्यशाळेत केले होते. मुख्य म्हणजे ही कार्यशाळा अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या ग्रंथालयात संपन्न झाली होती.

न्या. यादव १९९० सालापासून वकिली करत आहेत. डिसेंबर २०१९ मध्ये त्यांची 'अॅडिशनल जज' म्हणून अलाहाबाद हायकोर्टात नियुक्ती झाली आणि मार्च २०२१ मध्ये त्यांची कायम न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यांच्या आताच्या वक्तव्यावर आक्षेप घेत खासदारांनी महाभियोग चालवावा अशी मागणी केली आहे. या नोटिसीवर अपक्ष खासदार कपिल सिब्बल, काँग्रेसचे दिग्विजयसिंग, विवेक तंखा, माकपचे जॉन ब्रटास, राजदचे मनोज झा, तृणमूलच्या महुआ मोईत्रा वगैरे ज्येष्ठांच्या सह्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून १० डिसेंबर रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून अहवाल मागवला. त्याआधारे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्या. यादव यांना न्यायाधीश निवड मंडळा समोर (कॉलेजियम) त्यांची बाजू मांडण्यासाठी मंगळवारी बोलावलं होतं. अर्ध्या तासाच्या चर्चेनंतर कॉलेजियमने मत व्यक्त केले की न्या. यादव यांना असं विधान टाळता आलं असतं. या आधीसुद्धा न्या. यादव वादाच्या भोवर्यात सापडले होते. २०२१ मध्ये कोर्टात एक निर्णय देताना ते म्हणाले होते की 'गाय ही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असून तिला राष्ट्रीय प्राण्याचा दर्जा दिला पाहिजे'. अशाच एका आदेशात ते ऑक्टोबर २०२१ मध्ये म्हणाले होते की संसदेने राम, कृष्ण यांच्या सन्मानार्थ कायदा केला पाहिजे.

आपल्या राज्यघटनेतील तरतुदींनुसार राज्यसभेचे अध्यक्ष ही नोटीस फेटाळू शकतात. जर ही नोटीस स्वीकारली गेली तर नियमांनुसार एक चौकशी समिती गठीत केली जाईल. या चौकशी समितीत सर्वोच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, सभापती आणि सभापतींनी निवडलेला एक ज्येष्ठ विधिज्ञ असे सदस्य असतील. या समितीच्या अहवालात न्या. यादव जर दोषी आढळले तर या अहवालावर संसदेच्या दोन्ही सभागृहात यावर चर्चा आणि नंतर मतदान होईल. दोन्ही सभागृहांत जर ठराव २/३ मतांनी मंजूर झाला तर राष्ट्रपती न्यायाधीशांना सेवा मुक्त करतील. अशी ही कारवाईची नियमावली आहे.

लोकशाही शासन यंत्रणेत संस्थांमार्फत समाजाचे नियंत्रण केले जाते. लोकशाहीत संसद, मंत्रिमंडळ व न्यायपालिका हे तीन महत्त्वाचे आधारस्तंभ मानले जातात. २०व्या शतकातील अभ्यासकांनी यात 'माध्यम' या चौथ्या स्तंभाचा अंतर्भाव केला आहे. आपल्या देशात यातील पहिल्या दोन स्तंभांची विश्वासार्हता केव्हाच कमी झालेली आहे. संसदेत ज्या प्रकारे सर्व पक्षीय खासदार गोंधळ घालतात ते बघता हे लोकप्रतिनिधी आहेत की लग्नात गोंधळ घालणारे, असा प्रश्न पडतो. तसेच मंत्र्यांचा भ्रष्टाचार एवढा अव्वाच्या सव्वा आहे की त्याबद्दलसुद्धा काही बोलता येत नाही. आता यात न्यायपालिकेची भर पडते की काय अशी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे.

यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वर उल्लेख केलेल्या त्या दोन्ही सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या विरोधात 'आर्थिक भ्रष्टाचाराचे' आरोप होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश रामास्वामी यांनी पंजाब व चंदीगढ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असताना आर्थिक भ्रष्टाचार केल्याचा आरोप होता. तेव्हा म्हणजे १९९१ मध्ये केंद्रात नरसिंह राव यांचे अल्पमतातील सरकार सत्तेत होते. हे सरकार अण्णाद्रमुकच्या पाठिंब्यात उभे होते. न्या. रामास्वामी तामीळ भाषिक होते. अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा जयललिता यांनी नरसिंह राव यांच्यावर दडपण आणले. त्यानुसार महाभियोगाचा ठराव जेव्हा मतदानासाठी सभागृहात आला तेव्हा काँग्रेसचे सर्व खासदार अनुपस्थित राहिले. परिणामी ठराव बारगळला पण न्या. रामस्वामी यांनी तत्काळ राजीनामा दिला. त्यामुळे ते प्रकरण संपले.

महाभियोगाचे दुसरे प्रकरण तसे अलीकडचे म्हणजे २०१२ मधील आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. सेन यांच्यावरही आर्थिक भ्रष्टाचाराचे आरोप होते. ते जेव्हा कलकत्ता उच्च न्यायालयात वकिली करत होते तेव्हा त्यांनी सरकारी पैशांचा गैरवापर केल्याचा आरोप होता. त्यांनीसुद्धा सुरुवातीला राजीनामा देण्यास ठाम नकार दिला होता. पण जेव्हा त्यांच्या लक्षात आले की महाभियोगाचा ठराव मंजूर होणार आहे तेव्हा त्यांनी ठरावावर मतदान होण्याअगोदर काही तास राजीनामा सादर केला. तेव्हासुद्धा न्या. सेन यांनी राजीनामा दिला व प्रकरण मिटले. नंतर २०११ मध्ये आणखी एक कारवाई न्या. पी. डी. दिनकरन यांच्याविरोधात झाली होती. त्यांच्यावरील आरोपांची चौकशी समिती गठीत केली होती. पण त्याआधीच न्या. दिनकरन यांनी राजीनामा दिला होता. थोडक्यात म्हणजे आजपर्यंत जरी तीन वेळा कारवाई सुरू केली होती तरी ती पूर्णत्वास गेली नाही.

न्या. यादव यांचे चौथे प्रकरण.

या आधीची तीन प्रकरणं आणि न्या. यादव यांच्या प्रकरणात फरक आहे. न्या. रामास्वामी आणि न्या. सेन यांच्यावर आर्थिक घोटाळ्याचे आरोप होते. न्या. दिनकरन यांच्यावर त्यांनी अधिकारांचा गैरवापर केल्याचा आरोप होता. आता न्या. यादव यांच्यावर त्यांच्या राजकीय मतांबद्दल कारवाईची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. हे फार वेगळे प्रकरण आहे. आपल्या देशातील न्यायपालिकेचा पाया म्हणजे निःस्पृह, निर्भिड आणि तटस्थ न्यायपालिका. न्यायाधीश पदावर विराजमान झालेल्या व्यक्तीने जाहीरपणे स्वतःची राजकीय, आर्थिक मतं व्यक्त करू नये, असा संकेत आणि सेवाशर्त सुद्धा आहे. न्या. यादव यांनी याचा भंग केल्याचे प्रथमदर्शनी तरी वाटत आहे. त्यांनी उघडपणे बहुसंख्याकांची सत्ता वगैरे शब्दप्रयोग केले होते आणि तेसुद्धा विश्व हिंदू परिषदेसारख्या संस्थेच्या व्यासपीठावरून.

या संदर्भात चर्चेत आलेला मुद्दा म्हणजे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका! गेली ३० वर्षे यानेमणुका कॉलेजियम पद्धतीनुसार होत आहेत. मात्र, कॉलेजियम पद्धतीवर गेली अनेक महिने प्रतिकूल टीका सुरू आहे. आता याबद्दलची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. काही अभ्यासकांच्या मते नेमणुकांत अधिक पारदर्शकता असली पाहिजे. त्यानुसार ऑक्टोबर २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने वेबसाइटवर अशी माहिती टाकण्याचा निर्णय घेतला. आता याबद्दलसुद्धा चर्चा सुरू आहे. अशी पारदर्शकता असून काही उपयोग होत नसेल तर वेगळा विचार केला पाहिजे.

# एसटी प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून प्रवाशांवर जास्तीचा बोजा लादु नका.

सरकारने एसटी प्रवास भाडे कमी करण्यापेक्षा भरमसाठ वाढ करीत आहे ही बाब सर्वसामान्य प्रवाशांना न झेपणारी आहे. प्रवासभाड्यात १ किंवा २ टक्के वाढ कोणीही मान्य करू शकते व सहन करू शकते.परंतु प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली परिवहन महामंडळ जर १४.९५ टक्के प्रवास भाडे वाढ करीत असेल तर ही बाब सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण सरकारने अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे स्वागतच. परंतु प्रवाशांच्या सुविधांच्या नावाखाली सर्वसामान्यांची दिशाभूल करू नये. प्रवाशांना किंवा नागरिकांना सुविधा देणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते.त्यापध्दतीने सरकारला नियोजन सुध्दा करावे लागते ही बाब सत्य आहे.परंतु सरकार जर अचानक १४.९५ टक्के एवढी भरमसाठ वाढ करीत असेल तर असे म्हणायला हरकत नाही की सरकारने लागू केलेल्या अनेक योजनांची वसुली तर करीत नाही ना! अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात येईल. कारण प्रवाशांच्या सुविधांसाठी १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ ठीक आहे.यातुन महामंडळ चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करु शकते.त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने १४.९५ टक्के प्रवास भाडे यावर गांभीर्याने विचार करावा.कारण सरकार जेव्हा अनेक सुविधा नागरिकांना प्रदान करतात.तेव्हा त्याचा प्रथम विचार करायला हवा.अचानक जर आपण अवाढव्य भाडेवाढ करण्याचा विचार केला तर अनेकांची बोटे महामंडळ व सरकारवर उठतील. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने भाडे वाढीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे.एसटी महामंडळाच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नव्या वर्षात ३५०० नव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहे ही आनंदाची बाब आहे व याचे स्वागतच.कारण राज्यात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे १४.९५ टक्के भाडे वाढ ही बाब बरोबर नाही. राज्यात एसटी महामंडळाच्या १४ हजार बसेस धावतात यात ३५०० नवीन बसेस येतील यामुळे प्रवाशांना सुविधा उपलब्ध अवश्य होईल यात दुमत नाही.परंतु प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून याचा संपूर्ण भुर्दंड प्रवाशांवर लादु नये. शासनाने आपला खर्च कमी करावा, सरकारच्या अनेक कारवाईच्या मार्फत सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणात काळा पैसा आलेला आहे त्याचा वापर यासाठी करावा, त्याचप्रकारे अनेक प्रकारचे कर जमा होतात त्यातून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्यावी व प्रवाशांकडून हातभार म्हणून १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ करून सुविधा उपलब्ध करून द्यावी. यामुळे सरकार व प्रवासी यांच्यात समतोल राहील.राज्यातील अनेक बसस्थानकांचा चेहरामोहरा बदलणार ही आनंदाची बाब आहे याचे स्वागतच.परंतु सरकार जेव्हा अनेक योजना राबविते तेव्हा सरकारजवळ आपोआप पैसे येतो आणि जेव्हा प्रवाशांना सुविधा देण्याचा निर्णय सरकार घेते तेव्हा सरकार प्रवाशांजवळुन १४ .९५ टक्के भाडे वाढ करून सुविधा देण्याची गोष्ट करते हे योग्य नाही.एसटी प्रवाशांना सुविधा अवश्य द्या परंतु अवाढव्य भाडेवाढ करून नाही तर समतोल राखुन.प्रवाशांना एसटी प्रवासात सवलत द्यायची सोडून सुविधांच्या नावाखाली भरमसाठ वाढ करून गरीब प्रवासी, शेतकरी, सर्वसामान्यांना सरकार लुटते की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे. सरकारला व महामंडळाला एसटी प्रवाशांना खरोखरच सुविधा द्यायची असेल तर एखाद्या योजनेअंतर्गत द्यावी व एक किंवा दोन टक्के भाडेवाढ करून सरकारने प्रवाशांकडून मदत घ्यावी व एसटीचा आणि बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलवावा आणि संपूर्ण महाराष्ट्रात एसटी महामंडळाने आपले आगळेवेगळे स्थापन प्रस्थापित करावे.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गोंधळाचे पर्व

संसदेचे हिवाळी अधिवेशन शुक्रवारी समाप्त झाले. शेवटच्या दिवशीही भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने संसद भवनाच्या बाहेर निदर्शने केली. हे अधिवेशन संसदेच्या इतिहासातील सगळ्यांत गोंधळाचे अधिवेशन ठरावे.



गुरुवारी संसदेच्याच परिसरात काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीच्या खासदारांमध्ये कथितपणे धक्काबुक्कीही झाली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात भारतीय जनता पार्टीकडून एफआयआर दाखल करण्यात आली. राहुल यांना अटकही केली जाऊ शकते. तसे झाले तर जे संसदेत झाले ते पुढील काही आठवडे देशभरात पाहायला मिळेल. थोडक्यात, केंद्रातील मोदी ३ राजवटीची सुरुवातच गोंधळाने झाली असून देशातील एकूण रागरंग पाहता आपण आता गोंधळाच्या एका पर्वात अडकलो असल्याचे म्हणायला हरकत नाही. अधिवेशनात अनेक अप्रिय गोष्टी घडल्या आहेत. कामकाजाच्या नावाने शंखच होता. मात्र तरीही हे अधिवेशन कायमस्वरूपी कटू आठवण म्हणून स्मरणात राहील. त्याचे कारण घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात केली गेलेली टिप्पणी आणि त्यातून विरोधकांनी काढलेला अर्थ व त्यामुळे झालेले रणकंदन.

बाबासाहेब आंबेडकर कोण होते आणि त्यांचे कार्य काय हे प्रत्येक भारतीयाला माहिती आहे. जे इतिहासाचे, समाजशास्त्राचे, अर्थशास्त्राचे आणि राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत त्यांना अन्य लोकांपेक्षा अधिक माहिती आहे. त्यामुळे आताच्या काळात डॉ. आंबेडकरांच्या नावाने जो काही गदारोळ सुरू आहे व तोही त्यांनीच लिहिलेल्या घटनेच्या नावाने किंवा तिचा सतत उल्लेख करून यातून खरे कोण आणि खोटे कोण हेही सगळ्यांना समजते आहे. येणार्या काळात इतिहास याचीही नोंद घेईल आणि याचाही निवाडा केला जाईल. हा निवाडा निवडणुकीच्या राजकारणापुरता मर्यादित असणार नाही, तर देशात अंतर्बाह्य परिवर्तन झाल्याचे पाहायला मिळू शकते. संविधान, संघवाद, लोकशाही आणि आंबेडकरांच्या संदर्भात गृहमंत्री अमित शहा यांनी केलेली टिप्पणी व त्याला घेतलेला आक्षेप या आदी अत्यंत गंभीर बाबींचे भकास प्रदर्शनच अधिवेशनात घडले.

राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याचाही प्रकार घडला. त्यामुळे दोन दिवस वरिष्ठ सभागृहातही वेगळाच गोंधळ झाला. शेतकर्याचा मुलगा आणि मजुराचा मुलगा असा कलगीतुरा देशातील सगळ्यांत जुन्या राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे अध्यक्ष यांच्यात रंगला. तांत्रिक बाबी निदर्शनास आणून देत हा प्रस्ताव फेटाळण्यात आला. मात्र, अध्यक्षांवरच सभागृहातल्या सदस्यांचा विश्वास नसल्याचा जो दावा विरोधी पक्षांना देशापुढे मांडायचा होता त्यात त्यांना काही अंशी यश मिळाले. प्रस्ताव स्वीकारला असता अन् त्यात विरोधी पक्षांचा पराभव झाला असता हे जरी संख्याबळानुसार खरे असले, तरी अविश्वास ही मोठी बाब असते आणि ज्या सभागृहात न्यायाधीशांच्या भूमिकेत असणार्या व्यक्तीबाबतच तो दर्शवला जात असेल तर भविष्यात या कटुतेचे सावट त्या सभागृहाच्या कामकाजात सतत दिसत राहणार आहे.

अधिवेशनाच्या समाप्तीनंतर आता जेव्हा विचार करायचा झाला तर यातून नेमके काय हाती लागले? तर काहीच नाही. ज्या विषयांवर शेवटच्या दोन दिवसांत गदारोळ झाला तो सभागृहाच्या बाहेर झाला. ते विषय महत्त्वाचेच होते. तथापि, त्यात सर्वहिताच्या मुद्द्यापेक्षा राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्नच अधिक वरचढ ठरल्याचे दिसले. २५ नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या अधिवेशनाची सुरुवातच गोंधळ आणि गदारोळाने झाली आणि त्याची परिणती कामकाजाच्या तहकुबीत झाली. पहिला आठवडा पाण्यातच गेला. हा आठवडा गौतम अदानी नावाचे उद्योगपतींनाच वाहिला गेला. अमेरिकेत त्यांच्या विरोधात जो खटला दाखल केला गेला, त्यावर चर्चेची मागणी काँग्रेसने लावून धरली.

अदानी सरकारच्या मर्जीतील असल्याचा सुरुवातीपासून विरोधकांचा आरोप असल्यामुळे व त्याचे त्यांनी दाखले देण्याचे अनेक प्रयोग व प्रयत्न गेल्या दहा वर्षांत केले असल्यामुळे हा अत्यंत वादाचा मुद्दा राहिला आहे. सरकारने चर्चेला नकार दिल्यामुळे जरी त्या आरोपांना पुष्टी मिळाली तरी त्यातून संसदेचा एक आठवडा पूर्णपणे वाया गेला. विरोधकांच्या आघाडीतही अदानी विषयावरून दुही असल्याचे अधोरेखित झाले. त्याचे कारण अन्य राज्यांच्या नेत्यांना अनेक महत्त्वाचे आणि काही गंभीर विषयांवर चर्चा व्हावी अशी अपेक्षा होती, ती पूर्ण न झाल्याने त्यांनाही अधिवेशनातून काही साधता आले नाही. 'एक देश एक निवडणूक' हे विधेयक मांडत जेपीसीकडे पाठवण्यात आले. तशी भूमिका सरकारने अगोदरच स्वीकारली असल्यामुळे किमान ते एक काम मार्गी लागले. अर्थात, या विधेयकाला प्रचंड विरोध आहे आणि जरी विरोधांचा अडथळा पार केलाही तरी त्यामुळे भविष्यात निर्माण होणार्या अडचणी डोंगराएवढ्या आहेत. आपल्याकडच्या राजकारणाचा पोत पाहता भविष्यात पावलापावलावर नवीन आव्हाने या विधेयकामुळे निर्माण होऊ शकतील व त्यातून क्लिष्टता वाढण्याचीच संभावना अधिक आहे. बाबासाहेब आंबेडकर यांचा कोणी अनादर केला हा संघर्ष आता धोकादायक वळणावर आला आहे. बहुतांश राजकीय पक्षांनी त्यात उडी घेतली आहे. सर्वच पक्षांनी यावर अभ्यासपूर्ण चर्चा करण्याची गरज आहे. केवळ संविधान धोक्यात असल्याची हकाटी पिटून किंवा बाबासाहेबांचा तुम्हीच अनादर कल्याचे प्रत्यारोप करून समाजात खदखद निर्माण करणे अयोग्य आहे. गोंधळाचे हे पर्व संपावे.

# धोकादायक वैद्यकीय कचरा

आरोग्यसेवेत वापरल्या जाणार्या उपकरणांपासून मोठा कचरा निर्माण होत असतो. त्यापासून विषाणूंचा प्रसार होतो तसेच विषाक्त पदार्थ हवेत, जमिनीत सोडले जातात. त्यामुळे अप्रत्यक्षपणे मानवी आरोग्य संकटात सापडते. आरोग्यसेवा ही मानवी आरोग्य जपण्याचे आणि देखभाल करण्याचे काम करते. मात्र, त्यातून निर्माण होणार्या वैद्यकीय कचर्याची समस्या निर्माण झाली आहे. आरोग्यसेवेत वापरली जाणारी शेकडो टन प्लॅस्टिकची उपकरणे आणि साधनांतून निर्माण होणार्या कचर्यांपैकी ८५ टक्के कचरा धोकादायक नसतो. तो घरातील कचर्यांप्रमाणेच असतो. पण उर्वरित पंधरा टक्के कचरा हा धोकादायक मानला जातो. या कचर्यामुळे वातावरण दूषित होऊ शकते. संसर्गजन्य, रासायनिक आणि रेडिएशनचा धोका निर्माण होतो. आरोग्यसेवेत वापरण्यात येणार्या वैद्यकीय साधनांच्या कचर्यांचे सुरक्षितपणे निराकरण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक विल्हेवाट लावण्यासाठी योग्य व्यवस्थापनाच्या आधारे उपाय केले तर आरोग्यावर आणि पर्यावरणावर होणारे संभाव्य विपरित परिणाम रोखता येऊ शकतात.

आरोग्यसेवेतील वैद्यकीय कचर्यामुळे निर्माण होणार्या संभाव्य धोक्यात तीक्ष्ण वस्तूंने होणार्या जखमांचा देखील समावेश आहे.

आरोग्य सेवेतील कचर्याचे व्यवस्थापन किंवा त्याचे निर्मूलन करताना परिसरात सोडण्यात येणारी औषधी प्रामुख्याने अँटीबायोटिक्स आणि सायटीटॉक्सिक औषधे तसेच पारा किंवा डायऑक्सिनसारख्या घटकांच्या संपर्कात येणे, विषाणू संशोधन, लसीकरण किंवा कचर्यावर प्रयोग करताना त्यापासून निर्माण होणारे रासायनिक उत्सर्जन, आरोग्य उपकरणांचे निर्मूलन करताना हवेत कण मिसळल्याने होणारे हवेचे प्रदूषण, मोकळ्या जागेत जाळण्यात येणारी निरुपयोगी उपकरणे तसेच वैद्यकीय साधनांचा बेकायदा साठा, उपचार आणि निर्मूलनासाठी वापरण्यात येणार्या विषाणूविरोधी घटकांचा प्रसार, अपुरी आरोग्यसेवा यासारखे असंख्य घटक वैद्यकीय कचर्याला हातभार लावतात. यातही मर्यादित कायद्याची चौकट (धोरण, नियमावली, दिशानिर्देश), आरोग्यसेवेने निर्माण होणार्या वैद्यकीय कचर्याबाबत जनजागृती नसणे, कचर्यांचे व्यवस्थापन योग्यरित्या न होणे, मनुष्यबळाचा अभाव, कचरा व्यवस्थापनाला महत्त्व न देणे यासारख्या बाबींमुळे वैद्यकीय कचरा मोठ्या प्रमाणावर निर्माण होतो. अनेक देशांत तर यासाठी योग्य नियमदेखील नाहीत किंवा त्यावर देखरेख किंवा नियंत्रण ठेवणारी वेगळी नियामक संस्थादेखील नाही. जगभरात दरवर्षी अंदाजे १६ अब्ज इंजेक्शन दिले जातात. तुलनेने सुई आणि सीरिंज याचा सुरक्षितरित्या निपटारा केला जात नाही. म्हणून जखम होण्याची आणि संसर्गाची जोखीम अधिक होण्याची किंवा त्याचा पुनर्वापर करण्याचा धोका निर्माण होतो.

अलीकडच्या काळात निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांत कालबाह्य सुई आणि सीरिंजच्या वापरावर निर्बंध आणल्याने लसीकरणाचे प्रमाण कमी झाले. म्हणजेच काही प्रमाणात इंजेक्शन उपकरणांचा पुन्हा वापर करण्यावर बंदी घालण्यात आली होती. अशा प्रकारे जनजागृती केली जात असतानाही असुरक्षित मार्गाने इंजेक्शन अजूनही दिले जात आहेत. परिणामी जगभरात ३३ हजार ८०० जण नवीन एचआयव्ही बाधित, १.७ दशलक्ष हेपेटायटिस बी संसर्गबाधित आणि ३ लाख १५ हजार जण हेपेटायटिस सी संसर्गबाधित झाले आहेत. कचरा डेपोच्या ठिकाणी साङ्गसङ्गाई करताना तसेच आरोग्य सुविधेच्या दृष्टीने धोकादायक असणार्या कचर्यांची हाताळणी करताना तसेच विच्छेदन करताना अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. या गोष्टी जगभरात अनेक ठिकाणी सर्रास घडतात. प्रामुख्याने निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांत. सुईचा निपटारा करताना त्यापासून जखम होणे, विषाणू पसरणे यासारख्या गोष्टी होण्याचा अधिक धोका राहतो.

आरोग्यसेवेत वापरल्या जाणार्या उपकरणांपासून तयार होणारा कचरा हा उपचार आणि निर्मूलनाच्या वेळी पर्यावरणात विषाणूंचा प्रसार करणे तसेच विषाक्त पदार्थ सोडत असल्याने अप्रत्यक्षपणे मानवी आरोग्य संकटात सापडते. योग्य रितीने त्याची विल्हेवाट न लावल्याने किंवा योग्यरित्या निर्जंतुकीकरण न केल्याने भविष्यात पाणी, पृष्ठभाग, भूजल यात प्रदूषण होऊ शकते. म्हणूनच वैद्यकीय कचरा कमीत कमी निर्माण व्हावा यासाठी प्राधान्य देणे गरजेचे आहे. परिणामी वैद्यकीय कचर्याचे प्रमाण कमी होईल आणि त्याची हाताळणी करण्यात आणि विल्हेवाट लावणे सोयीचे होईल.

वैद्यकीय कचरा किमान पातळीवर आणण्यासाठी पर्यावरणपूरक खरेदी करणे, त्याची कमीत कमी वाहतूक करणे, पर्यावरणपूरक पॅकेजिंग करणे, सुरक्षित आणि व्यवहारिक पातळीवर वापर केल्यानंतर त्याच्यावर पुनर्प्रक्रिया करून अन्य ठिकाणी त्याचा वापर करणे यासारख्या गोष्टींवर भर दिला पाहिजे.

# लातूर-टेंभुर्णी च्या चौपदरीकरणासाठी ५७४ कोटी निधी मंजूर; केंद्रीय मंत्री गडकरी यांचे आ. कराड यांनी मानले आभार

लातूर : - गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या लातूर-टेंभुर्णी या रस्त्याच्या कामाचे केंद्र शासनाच्या वतीने वेगवेगळे टप्पे मंजूर करण्यात येत आहेत. त्यानुसार या रस्त्यावरील ३७ किलोमीटर अंतराच्या चौपदरीकरण महामार्गासाठी ५७४ कोटींचा निधी केंद्रीय रस्ते वाहतूक विकास मंत्री ना. नितीनजी गडकरी यांनी मंजूर केला आहे. सदरील निधी मंजूर करून रस्त्याच्या कामाला गती दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार रमेश आप्पा कराड यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.



पुणे - मुंबईकडे जाणारा लातूर ते टेंभुर्णी हा महामार्ग गेल्या अनेक वर्षापासून रखडला होता. लातूरकरांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याने या रस्त्याच्या कामाला निधी मिळावा यासाठी वेळोवेळी केंद्रीय रस्ते विकास मंत्री मा. नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन आ रमेशआप्पा कराड यांनी आग्रहाची मागणी केली होती. सदरील रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने या रस्त्याच्या कामाला टप्प्याटप्प्याने निधीची तरतूद करून कामाला गती देण्यात येत आहे.

लातूर - टेंभुर्णी या महामार्ग-६३ वरील जावळे-बोरगाव काळे दरम्यानच्या ३७.५२५ किलोमीटर मार्गाच्या पेव्हड शोल्डरसहित ४-लेन पुनर्वसन आणि अपग्रेडेशनसाठी ५७४.१८ कोटी रुपयांसह मंजुरी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे.

राज्यातील प्रमुख शहरांना जोडण्यांसाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. तसेच कृषी मालाची वाहतूक आणि व्यावसायिकांसाठी देखील हा मार्ग महत्त्वपूर्ण आहे. सदरच्या महामार्गाला तब्बल ५७४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून कामाला गती दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहे.

# ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांचा सत्कार

लातूर :लातूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. लातूर जिल्हातील पक्षाची बांधणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच पक्षाची जिल्हा बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत नवीन जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांचा जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या बैठकीस लिंबन महाराज रेशमे महिला जिल्हा संघटक जयश्री उटगे, सौ. सुनीता चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवती प्रमुख अँड. श्रध्दा जवळगेकर, युवा सेना प्रमुख दिनेश जावळे, निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, संतोष सुर्यवंशी, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष किशोर जाधव, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, देवणी तालुका




प्रमुख मुकेश सुडे शिवाजी चव्हाण, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे अँड. रवी पिचारे, संजय उजळबे, रेखा पुजारी, दैवशाला सगर, सुनीता भोसले, सतीश शिवणे, सुनील नाईकवाडे, शंकर रांजनकर, रमेश माळी यांच्या सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ..गाडगेबाबा



राष्ट्रसंत गाडगे बाबा

साधी राहणी
उच्च विचार
मन बदलण्या
करी शब्दाचा वार
गावोगावी फिरायचा
नवा माणूस जोडायचा
माणूसकीची बाग फुलविण्या
पडिक मनाला शोधायचा
मंदिर बांधून
पोसू नका भटाला
शाळा उभारुन
विद्या द्या लेकराला
जर्मनची भांडी विका
लेकराले शिकवा
सुज्ञ माणूस घडूनी
आपुल्या देशाला नटवा
तुम्हाले शिकायचं असेल
तर आंबेडकर व्हा
अंधारात चाचपडणाऱ्या
जीवासाठी आधार काठी व्हा
कोंबडी,बकरी कापताना
त्याचा जीव तडफडतो रे
तुमच्या लेकराले कापून बघा
बघणाऱ्या चे काळीज फडफडते
रे
देवळात देव नाही,
माणसात बघ बाबा
पोटतिडकीने सांगयचा
संत गाडगेबाबा
दारु गांजा फुकू नका रे
उघड्यावर संसार येईल बरं का
अंधश्रद्धा पाळू नका रे
कर्जाच्या बोजाने मोडेल मनका
हाती खराटा घेऊन
गावसारा स्वच्छ करी
कीर्तनातून धडे देवून
पुढच्या गावची वाट धरी
किती किती सांगायचे
गाडगे बाबाचे गुण
बा भिमाचे झाले निर्वाण
पंधरा व्या दिवसी सोडले प्राण
**********
विद्रोही,
दिलीप गायकवाड लातूर

# चंदनाच्या झाडांची अवैध तोड व वाहतुक . ६८ किलो चंदन, वाहनासह ११ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- चंदनाच्या झाडांची अवैध तोड व वाहतुक . ६८ किलो चंदन, वाहनासह ११ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरिता सुचित केले आहे. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला दि. १८ डिसेंबर ते १९ डिसेंबर रोजी मध्यरात्री पथकाला मिळालेल्या माहितीवरून आष्टामोड परिसरात चंदनाच्या लाकडाची अवैध वाहतूक करणाऱ्या लहान टेम्पोला पकडण्यात आले. सदरच्या लेलँड कंपनीच्या दोस्त टेम्पो च्या संरचनेत फेरबदल करून एक गोपनीय कप्पा तयार करून त्यामध्ये प्रतिबंधीत व संरक्षित चंदन वृक्षाची लाकुड चोरी करुन चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन असताना सदर पथकाने सापळा लावून सदरचा लेलँड कंपनीचा दोस्त टेम्पो क्रमांक




एम एच ४४ यू ३३०६ ची पाहणी केली असता त्यामधील गोपनीय कप्प्यामध्ये वृक्षतोड करण्यासाठी प्रतिबंधित व संरक्षित चंदनाची साल काढून तसलेला चंदनाचा गाभा व लाकडे मिळून आली.

सदरचे वाहन चालविणारे चालक व मालक हे अंधाराच्या फायदा घेऊन प्रसार झाले असून नमूद आरोपींना निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

पळून गेलेल्या आरोपी च्या ताब्यातील वाहनांमधून ६८ किलो चंदन, लेलँड कंपनीचे दोस्त नावाचे टेम्पो असा एकूण ११ लाख २२ हजार ८०० रुपयेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस ठाणे चाकूर येथे नमूद आरोपी विरुद्ध कलम ४१,४२ भारतीय वन अधिनियम १९२७ व ०४ महाराष्ट्र वृक्ष तोड अधिनियम, ३०३(२),३ (५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार चंद्रकांत डांगे, रामहरी भोसले, युवराज गिरी, अर्जुन राजपूत, सिद्धेश्वर मदने, गोविंद भोसले यांनी केली आहे.

# भीमाई माता

भीमाई मातेचा जन्म १४फेब्रुवारी १८५४साली झाला वडील लक्ष्मण मुरबाडकर हे इंग्रजी सैन्यात शुभेदार पदावर होते.
ठाणे जिल्ह्यातील
मुरबाड येथे राहत असत.
इ.स.१८६७मध्ये
वयाच्या तेराव्या वर्षी
रामजी सकपाळ यांच्या
बरोबर विवाह झाला तेव्हा
रामजी वयाने एकोणीस
वर्षांचे होते.
ठाणे जिल्ह्यातील
मुरबाड गावी राहत होते.
आणि तेथील इंग्रजी
सैन्याच्या १०६ सॅपर्स
अँन्ड मायनर्स तुकडीत
शिपाई म्हणून भरती झाले




भीमाई मातेला एकुण
चौदा अपत्ये झाली.
भीमराव हे सर्वांत लहान शेंडेफळ होते.
भीमाई मातेला जास्त आयुष्य लाभले नाही बाबासाहेब लहान असताना भीमाई मातेचा मृत्यु झाला.
बाबासाहेबांच्या आत्याने पालनपोषण केले.
भीमाई मातेचा मृत्यु २०डिसेंबर१८९६साली झाला
बाबासाहेबांना मातृसुख फारच कमी लाभलं.
भीमाई मातेच्या पवित्र स्मृतीस
कोटी कोटी कोटी प्रणाम
विनम्र अभिवादन

# हिवाळ्यात आपण आपल्या पाळीव प्राण्यांना किती वेळा अंघोळ घालावी? तज्ज्ञ काय सांगतात.

हिवाळा हा आपल्याप्रमाणेच पाळीव प्राण्यांसाठीही आव्हानात्मक असू शकतो. थंडी वाढल्याने अगदी नेहमीची अंघोळ करणेदेखील अत्यंत कठीण वाटू शकते. त्यामुळे अनेक जण थंडीत एकावर एक स्वेटर घालतात आणि काही लोक अंघोळ न करता, परफ्युम्स वापरतात. पण, थंडीचा आपल्या पाळीव प्राण्यांच्या अंघोळीच्या दिनचर्येवर कसा परिणाम होतो? हे जाणून घेण्यासाठी ने थंडीच्या महिन्यांत पाळीव प्राण्यांची स्वच्छता राखण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घेतला.

चेन्नईच्या ईस्ट कोस्ट पेट हॉस्पिटलमधील डॉ. रचना यांनी कुत्र्यांना महिन्यातून एकदा किंवा हिवाळ्यात अगदी आवश्यक असेल तेव्हाच अंघोळ घालण्याची शिफारस केली. थंड हवामानामुळे त्यांची त्वचा कोरडी पडते आणि त्यामुळे वारंवार अंघोळ करणे अनिष्ट ठरते. त्यांना स्वच्छ ठेवण्याचा आणि त्यांचे आरोग्य राखण्यासाठी नियमित घासणे हा एक चांगला मार्ग आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. रचना यांनी, जास्त प्रमाणात अंघोळ केल्याने त्यांच्या त्वचेतून नैसर्गिक तेल निघून जाते आणि त्यामुळे कोरडेपणा, खाज सुटणे व रुक्षपणा येतो. अशा स्थितीत पाळीव प्राणी अस्वस्थ होतात.

या ॲनिमल बिझनेस युनिटचे हेड महेंद्र ग्रोव्हर यांनी, पाळीव प्राण्यांना पंधरवड्याने अंघोळ घालण्याचा सल्ला दिला किंवा त्यांच्या त्वचेचे आरोग्य जपताना त्यांची स्वच्छता राखण्यासाठी आठवड्यातून एकदा पाणी न वापरता, त्यांची साफसफाई करण्याचा सल्ला दिला.

माणसांप्रमाणे पाळीव प्राण्यांची त्वचा पातळ असते आणि त्यामुळे त्यांचे संरक्षणात्मक कवच गमावण्याची अधिक शक्यता असते, असेही त्यांनी सांगितले. कार्निवेलचे बिझनेस हेड जे. एस. रामकृष्ण यांच्या मते, जास्त प्रमाणात अंघोळ केल्याने पाळीव प्राण्याचे थंड हवामानापासून नैसर्गिक संरक्षण कमकुवत होऊ शकते.

जर पाळीव प्राण्याची त्वचा खूप कोरडी झाली किंवा फर त्याचे इन्सुलेट गुणधर्म गमावत असेल, तर त्यांना सर्दी होऊ शकते किंवा ते त्वचेच्या संसर्गास अधिक संवेदनक्षम होऊ शकतात. हिवाळ्यात डेहराडून आणि मुंबईसारख्या प्रदेशांमध्ये विशेषतः हवेत आर्द्रता असते आणि जास्त अंघोळ केल्याने पाळीव प्राणी थंड वारे आणि हवामानाच्या परिस्थितीला असुरक्षित बनवू शकतात, ते म्हणाले.

हिवाळ्यात प्राण्यांची अशी घ्या काळजी

डॉ. रचना यांनी हिवाळ्यात पाळीव प्राण्यांच्या काळजीसाठी सांगितलेल्या महत्त्वाच्या गोष्टी खालीलप्रमाणे : तापमानाचे निरीक्षण करा : अत्यंत थंड किंवा वादळी परिस्थितीत कुत्र्याला चालण्यासाठी घेऊन जाणे टाळा.

# जेथे करावे कीर्तन।तेथे अन्नही न सेवावे।। माळ घालू नये गळा । बुका लावू नये भाळा।।

कीर्तन करणाराची व्याख्याच जर तुकोबा इतकी कठोरपणे करत असतील, तर तुकोबांच्या प्रबोधनाची भाषा किती कठोर असेल? वारकरी प्रबोधन परंपरेचं भांडवलीकरण कुणी वा कसं केलं हा मुख्य विषय आहे. कुणी जर देवाच्या वा संप्रदायाच्या नावाखाली सुरू असलेल्या भांडवलीकरणाची वा दुकानदारीची खिल्ली उडवत असेल, तर त्यात राग येण्याचं वा वाईट वाटण्याचं काय कारण आहे? विठोबा सर्वांचा आहे. आपल्या मालकीचा तर आपला देहही नाहीये. गावोगाव हरिनाम सप्ताह सुरू झाले आहेत. एरव्हीही ते होतच असतात. शेतीच्या प्रश्नांबद्दल, दुधाच्या प्रश्नाबद्दल, दुष्काळाने होरपळून निघणाऱ्या लोकांबद्दल, वाढती बेरोजगारी, सरकारी हुकूमशाहीबद्दल, स्त्रिया, दलित, आदिवासी किंवा सामाजिक तेढ निर्माण करण्याबद्दल, सर्व प्रकारच्या महागाईबद्दल, महाराष्ट्रातून उद्योगधंदे इतर फक्त आणि फक्त गुजरातमध्ये पळवून करण्याबद्दल, इव्हीएमबद्दल, परभणीत झालेल्या जातीय अत्याचारांबद्दल, बीडमधील अपहरण करून अमानवी अशा पद्धतीने केल्या गेलेल्या खुनाबद्दल वा सशा सर्व प्रकारच्या मानवी क्रूरतेबद्दल, अशा सर्व प्रश्नांबद्दल कीर्तनकार बोलणार नाहीत. ते भलतेच अजेंडे घेऊन गावोगाव पाकिटे घेत आपला गल्ला भरतील. उपस्थित श्रोतेदेखील विचारात पडत नाहीत याविषयी. हा सखेद. जेवणावळी नसतील तर कीर्तनांना किती गर्दी होईल? कितीतरी कोटींचा खर्च असतो. दहा गावांनी ठरवलं तर एक मोठं हॉस्पिटल या खर्चात सुरू होऊ शकतं. बुडती हे जन न देखवे डोळा।म्हणोनि कळवळा येत असें।। हे तुकोबांच्या कीर्तनाचं सूत्र होते. त्यांचे पूर्वसुरी वारकरी संप्रदायाचा पाया घालणारे या संप्रदायाचे प्रवर्तक संत नामदेव यांचे सूत्र होते, नाचूं कीर्तनाचे रंगी।ज्ञानदीप लावूं जगी।। देश भयाण अवस्थेतून चालला आहे. त्यावेळी प्रबोधन करणारांची जबाबदारी अधिक आहे. यावर्षी एखाद्या भागात दुष्काळ आहे म्हणून कुणा कीर्तनकाराने पाकिट नाकारले आहे. अशी बाब ऐकिवात नाही. अपवाद एकदोन असतील. पण फक्त एकदोनच. या पलीकडे नाही. संत गाडगेबाबा गावोगाव कीर्तन करायचे. ज्या गावात जायचे तिथे ते संपूर्ण गाव स्वच्छ करायचे. नदीवर जायचे. अंघोळ करायचे. स्वतःची कपडे धुवायचे. ती वाळवून गावात येऊन भाकरतुकडा मागायचे. मग जेवण करायचे. उरलेले अन्न गायवासराला, कुत्र्यामांजराला किंवा मग एखाद्या अनाथाला, गरिबाला द्यायचे. आणि मग रात्री कीर्तन. काय कीर्तन करायचे बाबा. समोर उपस्थित सगळे शेतकरी, कष्टकरी. शेतकऱ्यांना विचारायचे काय पिकवलस यंदा? शेतकरी म्हणायचा, 'बाजरी, ज्वारी,मठहुळगे जे पिकतं ते.' कुणाला विकलं? शेतकरी उत्तर द्यायचे 'व्यापाऱ्याला' बाबा म्हणायचे, 'मग भाव कोणी ठरवला?' शेतकरी उत्तर द्यायचे, 'व्यापाऱ्याने' बाबा पुन्हा प्रश्न विचारायचे, 'तेलमीठगूळ आणतो का घरी?' शेतकरी म्हणायचे, होय. मग बाबा म्हणायचे, तेलमीठगूळाचा भाव कोणी ठरवला? शेतकरी म्हणायचे, 'दुकानदारानं.' मग बाबा पुन्हा प्रश्न विचारायचे, तूच पिकवतोस. ते पिकलेलं परत दुकानातून तूच आणतोस. तुझ्या पिकाचा भाव ठरवायचा अधिकार तुलाच नाही. कसले रे कास्तकार तुम्ही? तू भाव ठरवत नाहीस म्हणून तुझं हे अठराविश्व दारिद्र्य. शिक्षण नाही. घोर अज्ञान तुझं. म्हणून हे दारिद्र्य. अशा सुप्त विद्रोहाला वाट मोकळी करून द्यायचे बाबा. शेवटचे कीर्तनकार होते बाबा. आज काय आहे? गावोगाव जेवणावळी उठवण्याची स्पर्धाच सुरू आहे जणू. वर्षभर आधी किंवा साताठ महिने आधीच कीर्तनकारांच्या तारखा बुक असतात. असं बुकिंग असणं म्हणजे काय अर्थ घ्यायचे याचे? हे -वींरपलश इेज्ञळपस ही संकल्पनाच पूर्णपणे भांडवलदारी व्यवस्थेतून आलेली आहे. ज्या तुकोबांनी आपल्या सावकारकीची सगळी कर्जखते इंद्रायणीत बुडवली, दुष्काळात स्वतःच्या घराचे धान्य उपाशी जनतेत वाटून दिले. धर्मांधांच्या असंख्य यातनांना तोंड दिले. त्यांच्या अभंगांवर निरूपण करण्यासाठी -वींरपलश इेज्ञळपस होतय. किती हास्यास्पद आणि विषाद वाटणारी ही गोष्ट आहे. हे -वींरपलश असणे म्हणजेच मोह आहे. याविषयी परखडपणे इथे लिहिले आहे. ही एकूण महाराष्ट्राच्या प्रबोधनपरंपरेची अधोगतीच आहे. याचे कुणाला फार वाईट वाटण्याचे कारण नाही. आणि वाटलेच तर तुकोबांच्या शिकवणीच्या वारश्याला पुढे नेण्याचा अभिमानच आहे. कीर्तनकार न म्हणता निरूपणकार किंवा रसग्रहणकार असं म्हणायला हवय. कारण, पदरचा एकही अभंग नसतो. दुसऱ्याच्या कवितेवर चिंतन मांडलेले असते. असो. तुकोबा लिहितात, सत्य आंम्हा मनीं।नव्हे गाबाळाचे धनी।। ऐसें जाणा रे सकळ।भरा शुद्ध आशंका मळ।। देतो तीक्ष्ण उत्तरे।पुढे व्हावयासी बरें।। तुका म्हणे बरे घडे।देशोदेशी चाले कोडें।। तुकोबा म्हणतात आमच्या मनात सत्य काठोकाठ भरलेले आहे. सत्य हाच आमचा परमेश्वर आहे. आम्ही इतर कुठल्याही गाबाळाचे किंवा केरकचऱ्याचे धनी होऊ इच्छित नाहीत. तशा प्रकारच्या मालकीची आम्हाला काही गरजही नाही. म्हणून तुम्ही या भावना समजून घ्या. आणि जे जे शुद्ध आहे ते स्वतः मध्ये भरून घेऊन तुमच्यात उरलेला मळ, घाण टाकून द्या. पुढे सर्वांचे भले होण्यासाठी तुकोबा असे परखड आणि कठोर शब्दांमध्ये व्यक्त होतात. ते म्हणतात की, या सगळ्यातून तुमचे चांगले झाले, तर तुमचेच सगळीकडे, गावोगावी कोडकौतुक केले जाईल. तुकोबांचे वारस म्हणून हा वारसा पुढे नेण्यासाठी कटिबद्ध राहणे म्हणूनच महत्त्वाचे आहे. सामाजिक सद्यस्थिती फारच वाईट आहे. द्वेषाचाच सोस सगळीकडे माजलेला आहे. आणि प्रबोधनाच्या नावाखाली काय काय सुरू असतं हे सांगायची फार गरज वाटत नाही. या सगळ्यापुढे महाराष्ट्रधर्म हा शब्द फार मोठा आहे. महाराष्ट्र या धर्मापुढे इतर सगळ्या गोष्टी मला क्षीण वाटतात. 'एक एका साह्यं करूं।अवघे धरू सुपंथ।।' गाडगेबाबांचा आज स्मृतिदिन. बाबांना विनम्र अभिवादन! शेवटचा कीर्तनकार!

****

श्रीकांत ढेरंगे

# सीमा सुरक्षा दलात दीक्षांत समारंभ संपन्न १७२ नवप्रशिक्षकांनी घेतली देशसेवेची शपथ

चाकूर (सुशिल वाघमारे) येथील सीमा सुरक्षा दल महाराष्ट्र सहाय्यक प्रशिक्षण केंद्राच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज परेड ग्राउंडवर शनिवारी दि २१ दलातील १७२ नवीन हवालदारांचा भव्य शपथविधी समारंभ परेड आयोजित करण्यात आला होता. या शपथ परेडची सलामी विनीत कुमार, महानिरीक्षक, सहायक प्रशिक्षण केंद्र, सीमा सुरक्षा दल, चाकूर यांनी घेतली. या नेत्रदीपक परेडचे नेतृत्व नवीन हवालदार हिमांशू यांनी केले. या हवालदारांचे प्रशिक्षण ०५.०२.२०२४ ते २१.१२.२०२४ पर्यंत ४४ आठवड्यांचे होते. त्यांचे मूलभूत प्रशिक्षण विनीत कुमार, महानिरीक्षक, सहायक प्रशिक्षण केंद्र, सीमा सुरक्षा दल, चाकूर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. यामध्ये महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, बिहार आणि पंजाब या राज्यांतील नवीन हवालदारांचा समावेश आहे. या समारंभात, त्यांच्या प्रशिक्षण कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या




नवीन हवालदारांना महानिरीक्षक विनीत कुमार यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले, त्यापैकी प्रथम क्रमांक १९० मधील हवालदार सोनपाल यांना सुवर्णपदक आणि ट्रॉफी देण्यात आली कॉन्स्टेबल अनिल कुमार चौहान यांना सर्वोत्कृष्ट पदक, सहनशीलतेतील सर्वोत्तम कॉन्स्टेबल उमेदा राम, फायरिंग कॉन्स्टेबल हिमांशू कुमार यांना सर्वोत्तम पदक प्रदान करण्यात आले. कॉन्स्टेबल हिमांशूला आजच्या भव्य परेडचे टॉपर पदक आणि परेड कमांडरची ट्रॉफी मिळाली. या सखोल प्रशिक्षणादरम्यान या सैनिकांना शारीरिक क्षमता, शस्त्रे, दारुगोळा, फील्ड क्राफ्ट, नकाशा वाचन आणि फील्ड इंजिनीअरिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय अंतर्गत सुरक्षा कर्तव्य, सीमा व्यवस्थापन, कायदा आणि मानवाधिकार आदी विषयांवरही प्रशिक्षण देण्यात आले.

विनीत कुमार, महानिरीक्षक, नवीन हवालदारांना संबोधित करताना म्हणाले की, प्रशिक्षणानंतर त्यांना भारत-पाक आणि भारत-बांगलादेश यांच्यातील विशाल सीमेच्या सुरक्षेसाठी तैनात केले जाईल. हे सैनिक भारताच्या सीमेवरील कठीण प्रसंगांना तोंड देण्यास सक्षम आहेत. सीमा सुरक्षा दलात पाठवून आपल्या शूर पुत्रांना देशसेवेसाठी समर्पित करणाऱ्या त्यांच्या पालकांनाही आदरांजली वाहिली. यावेळी त्यांनी परेड मैदानावर उपस्थित अभ्यागत, विशेष पाहुणे, मान्यवर, शाळकरी मुले आणि प्रसारमाध्यमांचे आभारही व्यक्त केले. दीक्षांत समारंभानंतर, मलखम कला आणि शारीरिक कार्यक्षमता नवीन हवालदारांनी सादर केली आणि पीएम श्री केंद्रीय विद्यालय, सीमा सुरक्षा दल, चाकूरच्या मुलांनी देशभक्तीपर नृत्य सादर केले.

# राष्ट्र संत गाडगे बाबा यांच्या ६८ स्मृती दिना निमित्याने समता फाउंडेशन विक्रोळी कार्यालयात अभिवादन

मुंबई :- राष्ट्र संत गाडगे बाबा यांच्या (२० डिसेंबर १९५६) ६८ स्मृती दिना निमित्याने समता फाउंडेशन विक्रोळी कार्यालयात अभिवादन करण्यात आले.समता फाउंडेशन बचत गटाच्या महिलानी समता भवन सूर्योदय गृहनिर्माण सोसायटी म्हाडा बिल्डिंग टागोर नगर विक्रोळी पूर्व येथे अभिवादन केले.यावेळी अविनाश पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तेव्हा एड.प्रमोद सागर तायडे,एड. चंद्रकांत खर्डे,सागर तायडे,बाळासाहेब भोसले,महेंद्र शिंदे,वर्षा चव्हाण,तनिष्का शिंदे,नेहा मालुसरे,प्रतिक्षा परदेशी,लक्ष्मी चावडा यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.समता फाउंडेशन च्या वतीने मुलांना प्लॅस्टिक पासून पर्यावरण वाचविण्यासाठी घराघरात पाण्याच्या बॉटल प्लेस्टिक कागद,चॉकलेट चे लेपर यांचे संकलन करण्याचे अभियान राबविण्यात येत आहे. त्यांच्या बॉटल राष्ट्र संत गाडगे बाबा यांच्या



६८ स्मृती दिना निमित्याने त्यांच्या प्रतिमे समोर ठेऊन प्लेस्टिक मुक्त पर्यावरण राबविण्याचा संकल्प करण्यात आला.

# मनपाची नविन वर्षाची ऑफर :मालमत्ता कर ७५ % शास्ती माफी

लातूर/प्रतिनिधी :- कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्ष्याच्या सुरूवातीपासूनच मालमत्ता धारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुट व १००% शास्ती माफी योजना ही लागू करण्यात आली होती. सदरील सुट चा लाभ घेऊन आतापर्यंत ३१ हजार हून अधिक मालमत्ता धरकानी आपला टैक्स भरणा केला आहे, परंतु अद्याप ही काही थकबाकीदार यांनी टॅक्स भरणा केलेले नाही. थकबाकीधारक नागरिकांसाठी मनपा सुवर्णसंधी घेऊन आले आहे .तेव्हा सर्व मालमत्ता



धारकाना कळविण्यात येते की, नविन वर्षा निमित्त लागू केलेल्या ऑफर अंतर्गत दि.०५/१२/२०२४ ते ०५/०१/२०२५ या कालावधीमध्ये आपल्याकडील थकीत कर एक रक्कमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये ७५ टक्के सूट देण्यात आली आहे. तरी या योजनेचा सर्व मालमत्ताधारकांनी लाभ घेवुन आपल्याकडील देय कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे व ०६ जानेवारी २०२५ पासून सुरू होणारे जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आव्हान आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# मोकाट जनावरे पकडण्यासाठी मनपाची मोहीम दीड लाखाचा दंड वसूल

लातूर/प्रतिनिधी :- शहरात फिरणारी मोकाट जनावारे पकडण्याची मोहीम मनपाने अशोक सेवा स्वच्छता सेवा मंडल यांच्या मार्फत हाती घेतली असून याअंतर्गत आतापर्यंत १५० जनावरे पकडण्यात आली आहेत.संबंधिताकडून एकूण १ लाख ५१ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

शहरात फिरणाऱ्या मोकाट गायी,बैल,म्हैस,रेडा,गाढव,शेळ्या आदी पशुना पकडण्यासाठी ही मोहीम सुरु करण्यात आली आहे.या अंतर्गत दि.१६ पर्यंत १५० जनावरे पकडून सिकंदरपूर येथील कोंडवाड्यात बंदिस्त करण्यात आली होती.त्यापैकी ३४ जनावराच्या मालकाकडून १ लाख ५१ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.ही सर्व जनावरे सिकंदरपुर येथे कोंडवाडा विभागात ठेवण्यात आली होती.मनपाच्या वतीने बेवारस म्हणून घोषित करण्यात आलेल्या ९५ जनावरांचे कायमस्वरूपी संगोपन करण्यासाठी ती जनावरे अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या तीन गोशाळांना सुपूर्द करण्यात आली आहेत.सध्या मनपाकडे ९ मोकाट जनावरे शिल्लक आहेत.

मनपाच्या वतीने मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे.त्यामुळे शहरातील पशुपालकांनी आपली जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत,अन्यथा ती पकडून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

# कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार घेऊन विद्यार्थ्यांनी कृतीशील व्हावे--डॉ हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी संत गाडगेबाबांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. विचारातून कृतिशीलता जपावी असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील भाऊसाहेब पाटील अध्यापक(बी एड) महाविद्यालयात संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हनुमंत सौदागर, प्रमुख पाहुणे प्राचार्य विजय शिनगारे ,सरस्वती महाविद्यालयातील प्रा.डॉ. हरिदास शिंदे,प्रा.डॉ. संतोष मस्के,अशोक घोडके, भूगोल विभागप्रमुख प्रा.डॉ. नागेश कराळे विचारपीठावर उपस्थित होते. प्रा.बलाढये यु.बी.,प्रा कचरे जे. एस. ,प्रा.लुंगारे एस.आर.,प्रा.जगदाळे एम. एच. ,प्रा.चोले एन.जे. ,ग्रंथपाल संतोष साळवी.



सुजीत नाईकवाडे यांची होती यावेळी बोलतांना डॉ. सौदागर म्हणाले. संत गाडगेबाबा हे मानवतावादी संत होते जीवनभरात सेवेचा वसा घेऊन दिवसभर गावातील घाण साफ करून रात्री लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण साफ करण्याचे कार्य त्यांनी केले. समाजसेवा सर्वश्रेष्ठ असल्याचा विचार त्यांनी दिला. त्यांच्या विचारातून देश घडत आहे. असे मत व्यक्त केले.छात्रअध्यापिका वैशाली थोरात,चैताली गायके,रुपाली देशमुख निकिता मुंडे,नेहा मुंडे,वैशाली हजारे,यांनी विचार मांडले कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरविंद गायसमुद्रे,सतीश नेहरकर,संजय गोसावी यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# केंद्रीय मंत्री अमितशहा यांनी केलेल्या बेताल वक्तव्याचा केला निषेध व्यक्त!

केज/प्रतिनिधी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बेताल वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयाच्या समोर निदर्शने करून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे. शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून, शिवसेना नेते आमदार सुनीलजी प्रभु, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर, उपनेत्या सुषमाताई अंधारे, बीड जिल्हा संपर्क प्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे, सहसंपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत, केज येथे तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली केज तहसील कार्यालय येथे निदर्शने करून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा असे निवेदन देऊन मागणी करण्यात आली. या वेळी जिल्हा सचिव रोहित कसबे, शहर प्रमुख तात्या रोडे, युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले, उपतालुकाप्रमुख सुरज वाघमारे, उपशहरप्रमुख पप्पू ढगे, दत्ता तांदळे, ज्ञानेश्वर बोबडे, अंगद देशमुख, वैजनाथ वाघमारे, मधूकर अंधा,रे आप्पा



कांबळे,लहु केदार, मारुती गव्हाने ,अमोल घुले, विश्वनाथ राऊत, अनिकेत शिंदे, कृष्णा केदार यांच्यासह तालुक्यातील शिवसेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागावी - राहुल सोनवणे संसदेत भाषणात शहा यांनी केला डॉ.आंबेडकर व जनतेचा अपमान

खा.सौ. रजनीताई पाटील आक्रमक या प्रकरणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी देखील या भाषणाच्या दरम्यान राज्यसभेत या वक्तव्याचा निषेध नोंदवत अमित शहा यांनी माफी मागावी अशी मागणी लावून धरली. या प्रकारामुळे संसदेत गोंधळाचे वातावरण तयार झाले विरोधी पक्षाच्या खासदारांनी याबाबत सभागृह बंद पाडले.

केज/प्रतिनिधी देशाच्या सर्वोच्च सभागृहात केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी भाषणात बोलताना घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली असून बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांच्या या वक्तव्याचा जाहीर निषेध करून त्यांनी याबद्दल जनतेची जाहीर माफी मागावी अशी मागणी करण्यात येत आहे. भारतीय जनता पार्टीने नेहमीच जातीयवादाचे बीज रोवले आहेत अनेक वेळा विविध जातीबद्दल त्यांच्या मनात द्वेष आहे हे आजपर्यंत अशा प्रकारामधून सिद्ध झालेले आहे. मात्र देशातील जनता हे कधीही खपवून घेणार नाही. परवा संसदेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल बोलताना आंबेडकर आंबेडकर म्हणायचं ही आता फॅशन झालीय असे निंदनीय वक्तव्य केले याचे पडसाद संसदेत तर उमटलेच मात्र देशात ही सर्वत्र याबद्दल निषेध व्यक्त केला जात आहे. त्यामुळे गृहमंत्री अमित शहा यांनी हे शब्द मागे घ्यावेत व देशातील जनतेची माफी मागावी अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केली आहे अन्यथा आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशाराही त्यांनी बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने दिला आहे.



# नांदेड जिल्ह्याचे डीएफओ वाबळे आणि किनवटचे सहा. वनसंरक्षक गणेश गिरी यांचा 'जंगल सफारी' उपक्रम

किनवट/शेख शौकत :-किनवटजंगलातील पर्यावरण आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने नदिडचे उपवनसंरक्षक केशव वाबळे यांनी सर्व वन अधिकारी, कर्मचारी यांना सोबत घेऊन जंगल ट्रेकिंग पायी चालत जंगल सफर हा उपक्रम हाती घेतला. जवळपास दीड महिन्यापासून हा उपक्रम किनवट माहूर तालुक्यातील जंगल भागात राबविला जात आहे. राजगड ते माहूर २० किलोमीटरचे अंतर ३५ ते ४० जणांच्या टीमने गाठून संपूर्ण जंगल पिंजून काढले आहे. अप्पारावपेठ अंतर्गत येणाऱ्या वागदरी, किनवट अंतर्गत येणाऱ्या राजगड, निचपूर ते माहूर तालुक्यातील जंगल असा २० किलोमीटरचा पायी चालत जंगल सफारी ट्रेकिंग करून क्षेत्रावरती मार्गदर्शन, नॅचरल कामे टाकता येतात. तसेच अतिक्रमण निर्मूलन, वन्य प्राण्यांची शिकार, अवैध वृक्षतोड होते का याची जंगल सफारी करून पाहणी करण्यात आली. दीड महिन्यात आतापर्यंत झालेल्या चार ट्रॅक मध्ये किनवटचे सहा. वनसंरक्षक गणेश गिरी, श्रीकांत ईटलोड यांच्यासह किनवटचे वन परिक्षेत्राधिकारी प्रमोद राठोड, माहुरचे




रोहित जाधव, अप्पारावपेठचे उमेश ढगे, इस्लापुरचे सचिन धनगे, भोकरचे प्रतिक मोडवान, मुखेडचे सागर हराळ, देगलूरचे निखिल हिवरे, हिमायतनगरचे बालाजी चव्हाण यांचा समावेश होता. ३५ ते ४० जणांची टीम जंगल सफारी करत ट्रेकिंग केल्याने अवैध वृक्षतोड करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. तर कार्यरत वन कर्मचाऱ्यांना कर्तव्याची जाणीव करून देण्यात आली आहे. नांदेडचे उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या उपक्रमांनी जंगल पिंजून निघाले आहे.

# स्पेशल इंटरसिटी सोडण्यासाठी दोन खासदार ठरले अपयशी,इंटरसिटीमुळे प्रवासी त्रस्त

किनवट/शेख शौकत :-आदिलाबाद ते नांदेड धावणारी इंटरसिटी विलंबाने धावणे नित्याचे झाले आहे. नांदेडला जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही इंटरसिटी डोकेदुखी ठरू लागली आहे. तिरुपती ते आदिलाबाद कृष्णा एक्स्प्रेसवर अवलंबून न राहता इंटरसिटी स्पेशल सोडण्यासाठी आदिलाबादचे खासदार नागेश घोडाम व हिंगोलीचे खासदार नागेश आष्टीकर हे दोन खासदार स्पेशल गाडी सोडण्यासाठी अयशस्वी ठरले असल्याचे प्रवासी संतप्त भाषेत बोलू लागले आहेत.

तिरुपती ते आदिलाबाद कृष्णा एक्स्प्रेस या गाडीवर अवलंबून असलेल्या आदिलाबाद ते नांदेड इंटरसिटी एक्स्प्रेस गाडी अलीकडच्याकाळात विलंबाने धावू लागली आहे. हे एक दिवसाचे नसून नित्याचे झाले आहे. तिरुपतीवरून आदिलाबादला येणारी कृष्णा एक्स्प्रेस उशिराने आली तर ती आदिलाबाद येथून नांदेडकरिता विलंबाने सुटते. गाडी नांदेडपर्यंत न जाता मुदखेडपर्यंत तर कधी मालटेकटीपर्यंत धावते.



गाडीची पहावे लागते वाट

अनेकदा तर आदिलाबाद ते नांदेड ही इंटरसिटी एक्स्प्रेस किनवट येथे १०:३० ११: कधी कधी तर.१२:३०.येते आणि नांदेडकरिता रवाना झाली. ज्या प्रवाशांकडे व्हेरीज माय ट्रेन अँप आहे ते प्रवासी ऑनलाईन पाहून रेल्वे स्टेशन गाठत आहेत; पण जे प्रवासी या अँपपासून कोसोदूर आहेत, ते मात्र सकाळी आठ वाजता स्टेशन गाठून गाडीची वाट पाहत बसतात अन् चार चार तास गाडीची वाट पाहण्याची वेळ प्रवाशांवर येत आहे. रद्द व विलंब ही वाढती डोकेदुखी लक्षात घेता मधल्या काळात कृष्णा एक्स्प्रेसवर अवलंबून न राहता स्पेशल १७ डब्यांची गाडी सोडण्यात आली होती; पण ती मध्येच बंद करून पुन्हा कृष्णा एक्स्प्रेसच इंटरसिटी म्हणून सोडण्यात येत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE